# एकाच दिवशी दोन बोगद्यांची कामे पूर्ण

म. टा. विशेष प्रतिनिधी

अनेक अडथळ्यांची शर्यत पार करत मार्गी लागलेला कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्प वेगाने पुढे सरकत असून गुरुवारी एकाच दिवशी दोन बोगद्यांची कामे पूर्ण झाली. या दोन बोगद्यांमुळे पूर्ण झालेल्या एकूण बोगद्यांची संख्या १२ झाली आहे. संपूर्ण भूमिगत असलेल्या या प्रकल्पात बोगदे खोदणे हे सर्वांत महत्त्वाचे काम आहे. सर्व बोगदे खोदून झाल्यानंतर या प्रकल्पातील एक मोठा टप्पा पूर्ण होईल. यापूर्वीही प्रकल्पाच्या अन्य स्थळी दोन बोगदे एकाच दिवशी पूर्ण करण्याचा योग जुळून आला होता.

विधानभवन मेट्रो स्थानकाच्या ९५ मीटर लांबीच्या बोगद्याचे काम सूर्या-१ या टनेल बोरिंग यंत्राने पूर्ण केले. विधानभवनासारख्या अत्यंत गजबजलेल्या भागात मेट्रो स्थानकाचे काम सुरू आहे. विधानभवन येथील बोगद्याचे काम पूर्ण झाल्यानंतर काही वेळातच विद्यानगरी येथील बोगद्याचे कामही पूर्ण झाले.




## आतापर्यंत पूर्ण झालेले बोगदे

- मरोळ नाका ते आंतरराष्ट्रीय विमानतळ (१.२ कि.मी.) - २४ सप्टेंबर २०१८
- सीप्झ मेट्रो स्थानक - २६ डिसेंबर २०१८
- दादर - ३० जानेवारी २०१९
- आंतरराष्ट्रीय विमानतळ - १३ फेब्रुवारी २०१९
- सहार स्थानक - २० फेब्रुवारी २०१९
- एमआयडीसी - १३ मार्च २०१९
- वरळी - १५ मार्च २०१९
- विद्यानगरी - १३ मार्च २०१९
- डोमेस्टिक विमानतळ - ४ एप्रिल २०१९
- विधानभवन-विद्यानगरी - १८ एप्रिल २०१९